## प्रकरण पहिले -

# निसर्ग प्रीती : तात्त्विक विचार

## - प्रकरण पहिले -

### निसर्ग प्रीती : तात्त्विक विचार

ललित साहित्यात काही विषय वारंवार आलेले आढळून येतात. असे विषय मानवी जिव्हाळ्याचे विषय असतात आणि म्हणूनच ते ललित साहित्य-निर्मितीला प्रेरक ठरलेले असतात. मानवी संदर्भात एखादा विषय जितका सार्वकालिक व सार्वजनिन, तितका तो ललित साहित्याला अधिक प्रेरक ठरतो. "निसर्ग" हा विषय अशाप्रकारचा एक व्यापक विषय आहे. निसर्गाचा माणसाशी असलेला संबंध व्यापक आणि घनिष्ट असतो आणि त्यामुळेच विश्वसाहित्यात सर्वकाळी निसर्ग चित्रण झालेले आढळते. माणसाला जशी माणसाची ओढ, तशीच निसर्गाचीही ओढ आहे. पशु-पक्षी, वृक्ष-लता, नदी-पर्वत, चंद्र-तारका इत्यादी निसर्गातील गोष्टी अनादीकालापासून माणसाला सातत्याने आकर्षित करीत आलेल्या आहेत.

### निसर्गविषयक मानवी आकर्षण

निसर्गाचे आकर्षण मानवाला उपजतच असते. मानवाचा जन्म निसर्गाच्या कुशीतच होत असतो. डोळे उघडताच मानवाच्या नजरेसमोर निसर्गाचे रंग - रूप - वैभव साकार होत असते. परमेश्वराने निसर्गाच्या रूपात नाना प्रकारची खेळणीच जणू मानवासमोर ठेवली आहेत. मानवही युगानुयुगे या निसर्गाकडे आकर्षित होत गेला आहे. आजच्या यंत्रयुगात मानव नगरवासी झाला, शहरी बनला, तथापि निसर्गाची ओढ कायमच आहे. यांत्रिकपणाने आयुष्य घालवणारा मानव डांबरी रस्त्यावरून, वाहनातून, जा-ये करतो. श्रमाची बचत, वेळेची बचत करता करता जीवनाची गती निश्चित करणारा मानव एखाद्या पावसाळी आकाशात चमकणारे इंद्रधनुष्य किंवा बगळ्यांची

मुक्तपणे उडणारी माळ दिसली की तिच्याकडे एखादी नजर टाकल्याशिवाय राहात नाही. या गोष्टी त्याचे लक्ष वेधून घेतातच.

निसर्गाकडे मानवाची ही धाव बालपणापासूनच स्वाभाविक रूपात व्यक्त होते. विविध रंग, रंगीबेरंगी पक्षी, प्राणी यांकडे लहान मूल चटकन् आकर्षिले जाते. निरनिराळे नैसर्गिक आवाज, ढगांचा कडकडाट, पक्ष्यांचे कूजन त्याला ध्वनींचा परिचय करून देते. मग त्याच्या बालविश्वात कुत्रा हा "भू" "भू" च्या रूपात येतो, मांजर "म्याऊ" बनते, तर गाय "हम्मा" बनून येते. आकाशातून मुक्तपणे पडणारा पाऊस बालकाला हवाहवासा वाटतो. लहान मुलांप्रमाणे मोठया माणसांनाही निसर्ग आपल्याकडे ओढतो. स्वत:च्या घराभोवती फुलझाडे लावणे, घरात ताजी फुले ठेवणे, प्राणी पाळणे या सर्वांतून तो विसावा, विरंगुळा शोधतो. संध्याकाळची रम्य निसर्गशोभा, चांदण्यारात्रीची शांत चंद्र--किरणांची बरसात, गुलाबी थंडीतील आल्हादकता या गोष्टी प्रत्येक ऋतूत त्याला पुन:पुन्हा निराळा आनंद देतात. मानव मग तो कोणत्याही देशातला, प्रांतातला असो, कोणतीही भाषा बोलणारा असो, निसर्गाची आणि त्याची मूक भाषा एकच असते. निसर्गाचे हे आकर्षण किती प्रभावी असते हे दाखविताना दुर्गा भागवत "ऋतुचक्र" मध्ये सांगतात, "निसर्ग तोच आहे,पण आता आमचे जीवन शहरी झाले आहे. जीवनाचे उद्दिष्ट-ही बदलू पाहते आहे. तरी पण एवढे खरे की,कुठे गवताचे पाते हलू दे, अधाप ते आमच्या डोळ्यांना रिझवते. सांजसकाळचे पूर्वपश्चिमेचे रंग सुखदायक वाटतात. वाऱ्याची झुळूक अपूर्व स्पर्शसुख देते. पावसाच्या सरी अजूनही कानांत काळाचे अनादी गूढ कवन ओततात." [१]

---

[१] दुर्गा भागवत : ऋतुचक्र, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, ४ थी आ, १९७३ प्रस्तावना-२.

मानवाने आपले उत्सव, सण, तीर्थयात्रा, धार्मिकविधी या--सर्वांना निसर्गाची जोड दिली आहे. उत्सवातील वृक्ष, पुष्प, फल, यांची विशिष्टता, तीर्थयात्रेची ठिकाणे ही सर्व निसर्गप्रेमाची द्योतक आहेत. जिथे निसर्गाचे मुक्त वातावरण आहे अशा पर्वतशिखरांवर आमची तीर्थक्षेत्रे वसलेली आहेत. आजही रोजच्या कटकटीच्या जीवनातून मुक्त होण्यासाठी मनुष्य सहलीच्या निमित्ताने निसर्गाच्या सहवासात जातो. आजच्या धकाधकीच्या जीवनात तेथे त्याला विरंगुळा लाभतो.

संसारी माणूस जसा निसर्गप्रेमी आहे तसाच सर्वसंगपरित्याग केलेला साधूही. संन्यासी, साधू निसर्गाकडे कसे आकर्षित होतात याची माहिती आ. रामचंद्र शुक्ल यांनी दिली आहे. "पर्वत शिखरांवर तसेच जंगलातून फिरताना मी असे अनेक साधू पाहिले आहेत की, ते डोलणा-या हिरव्यागार वनश्रीला, कातळावरून वाहणा-या स्वच्छ रूपेरी झ-यांना, चौकडी मारणा-या हरणांना, पाण्यात डोकावलेल्या फांदीवर कलकलाट करणा-या पक्ष्यांना पाहून मुग्ध झालेले आहेत.... अर्थात् ही गोष्ट सिध्द होते की, वन, नदी, पर्वत, पशू, पक्षी, शेतीवाडी इत्यादी बद्दलचे आमचे प्रेम स्वाभाविक आहे वा कमीत कमी वासना रूपात अंत:करणात निहित आहे." [१] [ मराठी अनुवाद ]

सुखी माणसाला, साधुसंतांना आनंदाच्या काळी निसर्गाची शोभा आल्हादक वाटतेच, पण मनुष्य दु:खात, निराशेत असतानाही त्याला मानवी समाजापासून दूर निसर्गात, एकांतात जाण्याची इच्छा होते. अशा निराश, उदासीन मानवाची साथसंगत करणारा निसर्ग

---

[१] रामचंद्र शुक्ल : चिंतामणि, भाग-१, सरस्वतीमंदिर, वाराणसी, चतुर्थ आ. १९५८ पृ. ५.

त्याला मूक सांत्वना देतो. निसर्गातील परिवर्तन, विकासक्रम, रात्रीनंतर येणारा दिवस, पर्णहीन शिशिरानंतर येणारा वसंत मानवाला पुन्हा नवी उमेद, नवा उत्साह देतो.

निसर्गाची अशी ओढ प्रत्येक मानवाला आहे. मानवाच्या साध्या साध्या कृतीतून ही निसर्गासक्ती व्यक्त होते. घरात वाट चुकून आलेले एखादे फुलपाखरू मुक्त होण्यासाठी दाही दिशा शोधू लागते. अशावेळी मनुष्य त्या गोंधळलेल्या प्राण्याला इजा न करता पुन्हा बाहेरच्या मुक्त वातावरणात जाण्यास मदत करतो. साधू, ऋषी, मुनी निसर्गाच्या रमणीय, एकान्तात ईश्वराची आराधना करतात. ग. दि. माडगूळकरांच्या " वेडा पारिजात " मधील तात्या आपला गाव सोडून राहू शकत नाही. " बनगरवाडी "तील काकूबा धनगर, दुष्काळात सारी वस्ती स्थलांतर करू लागली तरी, "माझी माती इथंच पडंल" म्हणत दोन चार मेंढरे घेऊन राहातो. ज्ञानेश्वरीसारख्या भाष्य ग्रंथात " समाधी करता योग्य स्थान कोणते " याचे उत्तर देताना तत्त्वज्ञ कवी ज्ञानेश्वर निसर्गरमणीयतेचे सुंदर चित्र उभे करतात. पं. जवाहरलाल नेहरू आपल्या मृत्युपत्रात अंतिम इच्छा व्यक्त करताना गंगानदीचे विविधांगी रूपवैभव चित्रित करतात. थोडक्यात, लहान मुलापासून प्रौढापर्यंत, संसारी माणसापासून संन्याशा--पर्यंत, अनुरक्त-विरक्त, सुखी-दु:खी, सामान्य व्यक्तीपासून साहित्यिकां--पर्यंत सर्वांना निसर्गाची ओढ आहे, आकर्षण आहे. निसर्ग मानवाचा सखा, सहचर आहे. उगवता मावळता सूर्य, टिपूर चांदणे, फुलांचे रंग-रूप वैभव, पक्ष्यांचे कूजन ह्या सर्वांनी माणसाचे मन सहजच वेधले जाते. निसर्गाचा ज्याच्यावर परिणाम होणार नाही असा माणूस " माणूस " या उपाधीलाच योग्य ठरणार नाही. आचार्य बलदेव उपाध्याय माणुसकीचे गमक सांगताना म्हणतात, " निसर्गाच्या सरस दृश्याने ज्याचे हृदय आकर्षित होत नाही, असा पुरूष जर मानव असेल तर दानव म्हणून कुणाला

हाक मारायचीः. आम्ही तर निसर्गप्रेमालाच मानव हृदयाची सच्ची कसोटी समजतो. [१] [ मराठी अनुवाद ]

निसर्ग प्रीतीची कारणे -

माणसामध्ये निसर्गाविषयी हे जे स्वाभाविक आकर्षण दिसते त्याच्या कारणांचा शोध घेण्याचा प्रयत्न पंडितांनी केलेला आहे. वैज्ञानिकांनी या संदर्भात "संघर्षवादा"चा विचार मांडलेला आहे. या संघर्षवादाच्या उपपत्तीप्रमाणे मानवाचा निसर्गाशी सतत संघर्ष चालू असतो. तो निसर्गावर विजय मिळवू पाहातो. निसर्गाशी झगडून निसर्गावर विजय मिळवण्याच्या महत्त्वाकांक्षेमुळे मनुष्य निसर्गाकडे आकर्षित होतो असे संघर्षवादाचे म्हणणे आहे. "पंचमहाभूतांच्या तृप्तीचा वाद" नामक एक उपपत्ती मांडण्यात आली आहे. या वादाच्या मते मानवसृष्टी पृथ्वी, जल, अग्नी, वायू व आकाश या परस्पर विरोधी तत्त्वांच्या समुच्चयाने बनलेली आहे. स्वगुणाशी एकस्पता, तर परगुणाशी संघर्ष असे पंचमहाभूतांचे कार्य असते. यापैकी स्वगुणाच्या एकस्पतेशी निसर्गप्रीतीचा संबंध आहे. आकाशातून सांडणारे नक्षत्रांचे तेज, चंद्रकिरणांची प्रभा, यांच्यामुळे आपल्यातील अग्नितत्त्व संतुष्ट होते आणि म्हणून या गोष्टी आपल्याला भुरळ पाडतात असे हा वाद सांगतो. निसर्गप्रीतीचा खुलासा करणारा आणखी एक वाद म्हणजे " पूर्यपूरक संबंधाचा वाद ." पंचमहा- -भूतांच्या तृप्तीच्या वादाशी हा मिळताजुळता वाद आहे. या वादाच्या समर्थकांनी मानवी शरीरात एका चैतन्याचा स्वीकार करून शरीर आणि निसर्ग यांच्यामध्ये पूर्यपूरकसंबंध दाखवला आहे. त्यांच्या मते आपल्या

---

[१] आ. बलदेव उपाध्याय, भारतीय साहित्यशास्त्र, द्विसंस्करण, वाराणसी, १९६३ पृ. ५११.

शरीरातील चैतन्य निसर्गातील घटकांनी शरीरामध्ये असलेल्या उणिवांची भरपाई करते. फुलांच्या सुगंधाने आपणास आनंद का होतो ? पूर्यपूरक--संबंधाचा वाद सांगतो की, शरीरस्थित चैतन्य पृथ्वीतत्त्वाच्या अभावाचा अनुभव घेत असते. फुलांच्या सुगंधाने या अभावाची पूर्तता होत असल्यामुळे माणसाला फुलांचा सुगंध आनंददायक वाटतो. "आत्मतत्त्वप्रसाराचा वाद" सांगतो की, मनुष्य आणि निसर्ग यात एक मूलआत्मतत्त्व भरून राहिलेले आहे. दोहोंत एकच एक आत्मतत्त्व असल्यामुळे माणसाचा निसर्गाकडील ओढा स्वाभाविक ठरतो. निसर्गप्रीतीचे स्पष्टीकरण करणारा "प्रकृतिघटकत्त्व वाद" सांगतो की, मनुष्य हा मूलत: निसर्गाचा एक घटक आहे. "विकास--वादाचा सिध्दांत"ही मानवाला निसर्गाचा एक अवयवच समजतो. मनुष्य निसर्गाचा असा घटक असल्यामुळे त्याने निसर्गावर प्रेम करावे हे साहजिकच होय. माणसाच्या निसर्गप्रीतीचा उलगडा करणारे असे अनेक सिध्दांत वैज्ञानिकांनी, तत्त्वज्ञांनी आणि विकासवाद्यांनी मांडलेले आहेत. तथापि या सर्व वादांमध्ये निसर्गप्रीतीच्या संदर्भात अनेक शंका उपस्थित होऊ शकतात. निसर्गप्रीतीचा सर्वांगीण खुलासा या वादांनी होऊ शकत नाही. डॉ. वि. ना. कुलकर्णी यांनी या वादांची विस्तृत चर्चा करून त्यांच्या मर्यादा आपल्या प्रबंधातील " मनुष्य आणि निसर्ग यांचा घनिष्ट संबंध " या प्रकरणात दाखवून दिल्या आहेत.[१]

साहचर्यवाद

मानवी निसर्गप्रीतीचा उलगडा करणारे परस्परपूरक असे दोन वाद आहेत. ते म्हणजे "साहचर्यवाद" आणि "सौंदर्यवाद" हे होत. मानवाला

---

[१] डॉ. वि. ना. कुलकर्णी, मराठी ललित साहित्यातील निसर्ग, प्रबंध, शिवाजी विद्यापीठ, नोव्हें. १९७२ पृ. ५ ते ११

निसर्गाचा सतत सहवास घडतो. तो निसर्गाला टाळू शकत नाही. मानव उत्पत्तीच्या आद्यकाळापासून निसर्गाचा हा सहवास सतत घडत आला आहे. आजच्या यंत्रयुगातही मनुष्य निसर्गाला डावलू शकत नाही, किंबहुना निसर्गाचा सहवास त्याला हवाहवासाच वाटतो. शहरी माणसाचे हे निसर्गाचे आकर्षण दाखवून देत दुर्गा भागवत लिहितात, "शहरी मानवाला निसर्ग असा हरघडी ओढीत असतो. कामाचे घाईचे तास नि तास, दिवस, महिने, वर्षही सोडल्यास जे चार फुरसतीचे क्षण मिळतात, त्यावेळी आपण सहज त्या खिडकीबाहेर डोकावतो. मग शेजारच्या घराच्या छपरावर पडलेले ऊनही किती वेगळे वाटते. त्या वाकडया तिकडया छाया ! घराच्या भिंतीतच उगवून हलणारे वडाचे रोपटेही कसे जिवन्त व जवळचे वाटते. ते घुमणारे पारवे तर मन ओढून घेतातच, पण हे काळे कुळकुळीत कावळे तेही चटचटीत उन्हात, त्यांच्या त्या तुळतुळीत पंखांवर व पाठीवर मोरपंखी छटा दिसल्यामुळे किती सुरेख दिसताहेत." [१]

निसर्गाशी आपला सतत सहवास असतो. हा निसर्ग आपल्या आजुबाजूला चौफेर पसरलेला आहे. निसर्गाशी हा जो प्रत्यही घडणारा आपला सहवास, असतो त्यातच निसर्गप्रीतीचे मूलकारण दडलेले आहे, असे काही विचारवंतांचे म्हणणे आहे. निसर्गाचे हे साहचर्य केवळ आजचे नाही. अगदी सनातन पुरातन काळापासून माणसाला निसर्गाचे साहचर्य लाभत आलेले आहे. हे साहचर्यच मानवी निसर्गप्रीतीचे कारण मानले गेलेले आहे. इतकेच नव्हे, तर हे निसर्गप्रेम वासनेच्या रूपाने वंशपरंपरेनेच आपल्या हृदयात उतरते असा साहचर्यवाद्यांचा सिध्दांत आहे. हिंदीतील आ. रामचंद्र शुक्ल यांनी

---

[१] दुर्गा भागवत, ऋतुचक्र, [प्रस्तावना] पॉप्युलर, मुंबई, ४, थी आ. १९७३ पृ. २.

आपले हे म्हणणे मोठया आग्रहाने वारंवार मांडलेले आहे. ते सांगतात, " ज्या प्राकृतिक दृश्यांच्या सहवासात आपले आद्य पूर्वज वास्तव्य करून होते आणि ज्यात आजही मानवी समाजाचा अधिकांश भाग [ जो नगरवासी झालेला नाही ] आपले आयुष्य घालवतो आहे, त्यांच्याबद्दलचा प्रेम-भाव पूर्वसाहचर्याच्या प्रभावाने संस्कार वा वासनेच्या रूपात आमच्या अंत:करणात निहित आहे. त्यांच्या दर्शनाने वा काव्य इत्यादीतील अभिव्यक्तीने आमच्या आंतरिक प्रकृतीचे मनोरंजन होते, हे अमान्य करता येणार नाही.[१] " [ मराठी अनुवाद ] ही पारंपरिक सहवासजन्य वासनाच आमच्या निसर्गप्रीतीचे कारण आहे, असा आ. शुक्ल यांनी सिध्दांत मांडलेला आहे.

एखाद्या वस्तूबद्दल, स्थलाबद्दल किंवा व्यक्तीबद्दल सहवासाने प्रेम निर्माण होते ही नित्य अनुभवातील गोष्ट आहे. निसर्गातील अनेक वस्तूंशी, रमणीय स्थळांशी आपला संबंध येतो आणि त्यामुळे निसर्गाबद्दल आपल्या ठिकाणी प्रेमभाव निर्माण होतो ही गोष्ट अनुभवान्ती पटण्याजोगीआहे. पण परिचयाने प्रेमनिर्माण होते असा जसा आपला अनुभव असतो, तसाच अतिपरिचया--मुळे अवज्ञा होत जाते असाही आपला अनुभव असतो. तथापि " अतिपरिचयात् अवज्ञा " हा सिध्दांत निसर्गप्रेमाला लागू पडत नाही. युगायुगांपासून निसर्गातील तीचती दृश्ये पुन:पुन्हा आपण पाहातो. तोच चंद्रोदय, तोच उष:काल, तेच नक्षत्रांकित आकाश! पण या अतिपरिचयाने या दृश्यांतील उत्कटता मुळीच कमी होत नाही. ही दृश्ये सातत्याने आपले मन वेधून घेतात. निसर्गाच्या बाबतीत अतिपरिचयाने अवज्ञा होण्याची शक्यताच उत्पन्न होत नाही. कारण हा निसर्ग नित्य नवीन रूपाने मानवासमोर येत असतो. त्याच्या या

---

[१] रामचंद्र शुक्ल, चिंतामणि, भाग-२, सरस्वती मंदिर, वाराणसी, चतुर्थ आवृत्ती १९५८, पृ.४.

नित्य नवीन आणि रमणीय रूपाने माणसाची त्याच्यासंबंधीची जिज्ञासा, उत्कंठा सतत वाढतच जाते. किंबहुना त्याचे क्षणाक्षणाला बदलणारे हे रूपच त्याच्या रमणीयतेचे अधिष्ठान असते. "शिशुपालवध" काव्यात भारवीने " क्षणे क्षणे यन्नवतामुपैति तदेव रूपं रमणीयताया: । " या वचनात नेमकी हीच गोष्ट सांगितली आहे. पुन्हा निसर्गाच्या बाबतीत नीती, धर्म या सारख्या कल्पनांना महत्त्व नसल्यामुळे किंवा त्याच्याबाबतीत स्वार्थाचा संबंध येत नसल्यामुळे निसर्गाशी संघर्ष निर्माण होण्याची शक्यता नसते. निसर्गाचा सारा प्रतिसाद सुखकारक, आल्हादकच असतो. तो मानवाचा सखा, सहचर, माता, गुरू, प्रियकर बनत असतो आणि म्हणूनच निसर्गप्रीतीमध्ये अतिपरिचयामुळे होणाऱ्या अवज्ञेला जागा नसते.

## सौंदर्यवाद

निसर्गाच्या सततच्या साहचर्यामुळे माणसामध्ये निसर्गाबद्दल आपुलकी आणि प्रीती निर्माण होते, पण माणूस निसर्गाच्या सान्निध्यात जातो त्याचे कारणच मुळी तो सुंदर आहे हे आहे ! आणि माणसाला सौंदर्याचे स्वाभाविक--पणे आकर्षण असते. निसर्गाच्या नितांत रमणीय सुंदरतेमुळेच मनुष्य निसर्गाच्या सान्निध्यात जाऊ इच्छितो. सौंदर्याची आसक्ती ही एक स्वाभाविक गोष्ट आहे. मानवी इंद्रियांना सुंदर वस्तूंचे, सुखदायक वस्तूंचे मोठे आकर्षण असते. डोळ्यांना आल्हादक रंग, आकर्षक रूप पाहावेसे वाटते. त्वचेला आरामदायक स्पर्श अनुभवावासा वाटतो. हे इंद्रियजन्य सुखास्वाद निसर्गात स्वाभाविक रूपात उपलब्ध होतात. निसर्ग हे सौंदर्याचे अखंड, अक्षय भांडार आहे. तसेच हे सौंदर्य सर्वोपलब्ध आहे. चंद्राचे चांदणे गरीब व श्रीमंत सर्वांना मुक्तपणे उपभोगता येते. या निसर्ग सौंदर्याचा मुक्त आस्वाद घेण्याचे स्वातंत्र्य मानवाला आहे.

निसर्गातील सौंदर्याची व्यापकता, विविधता अमर्याद आहे. पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश या पंचमहाभूतांचे सौंदर्य मानवाला अनेक रूपांत, अनेक प्रकारांनी आकर्षित करते. दवबिंदूच्या गवतावरच्या चमकणाऱ्या लहान थेंबापासून महासागरापर्यंत जलतत्त्व नाना रूपांत समोर येते. दीपकळीच्या सफेद रंगज्वालेपासून महातेजाच्या अनंत रंग-छटा, मातीच्या गंधापासून मलय पर्वताच्या चंदनमिश्रित वायुगंधापर्यंतच्या अनेक गंधवृत्ती मानवी इंद्रियांना सुखावतात, आनंद देतात.

परिचयात प्रेम आहेच, पण त्यातही परिचित वस्तू सुंदर असेल तर त्या प्रेमात एक अनिवार उत्कटता निर्माण होते. मानवाच्या निसर्गप्रीतीमध्ये निसर्गाच्या अंगभूत सौंदर्याचा अंश फार मोठा हिस्सा आहे. सौंदर्यात मनुष्य तल्लीन होऊन जातो आणि निसर्ग हे अगणित सौंदर्याचे भांडार आहे. नाना वर्ण, रस, गंध, आणि कोमल स्पर्श यांची विराट सामुग्री निसर्गात भरून राहिलेली आहे. आकाशाचा निळसर अनंत विस्तार, कृष्णरात्री दिसणारी नक्षत्रांची चमचम, पौर्णिमेचा रजतरसाचा वर्षाव, काळ्याकभिन्न मेघांतील विद्युल्लतेचा क्षणभराचा नाच, इंद्रधनुष्याचे सप्तरंगी वैभव, विविध वर्णांच्या पुष्पांचा विलास - हे सारे सृष्टीचे निरुपम सौंदर्य माणसाला आपल्याकडे ओढीत असते. रम्य दृश्य पाहिल्यानंतर आणि मधुर शब्द ऐकल्यानंतर माणसाने पर्युत्सुक व्हावे हे स्वाभाविकच होय. कालिदासाची शकुंतला "निसर्गकन्या" आहे. वनज्योत्स्नेशी तिचे बहिणीचे नाते आहे, आश्रमातील वृक्षांवर तिचे अपार प्रेम आहे. आश्रमविहारी गरोदर हरिणीला सोडून जाताना ती कातर होते. आपल्या पायात घुटमळणाऱ्या पाडसाचे ती समाधान करते. शकुंतलेने आपल्या हातांनी यांना वाढवले आहे. ह्या सर्व वस्तू शकुंतलेच्या सहवासातील आहेत,पण ह्या सर्व वस्तू सुंदर आहेत ही गोष्टही तितकीच महत्त्वाची आहे. सहवासातील "रम्य" आणि "मधुर" गोष्टींशी तिची मैत्री आहे.

मानवी निसर्गप्रीतीमध्ये ख-या अर्थाने सौंदर्यवादच महत्त्वाचा आहे. निसर्ग हे अंगभूत सौंदर्याचे अगणित भांडार आहे. निसर्ग ही ईश्वरनिर्मित फार मोठी सुसंगती आहे. त्याच्या रंगरेषांत, आकारप्रकारांत राशिराशीने सौंदर्य विखुरलेले आहे. मानवाच्या ठायी असलेली सौंदर्यभावना निसर्गाच्या सहवासात पुष्ट झालेली आहे आणि म्हणून निसर्गप्रीतीच्या मीमांसेत "साहचर्यवाद" आणि "सौंदर्यवाद" परस्परपूरक असलेले वाद महत्त्वाचे ठरतात. किंबहुना निसर्गातील सुंदरतेमुळेच त्याच्या सहवासाची ओढ निर्माण होते.

अर्वाचीन काळामध्ये साहित्यातील नवीन रसांचा शोध घेतला जाऊ लागला आहे. त्यामुळे परंपरागत नऊ रसांमध्ये नवीन नवीन भर पडत चाललेली आहे. हिंदीमध्ये निसर्गकाव्यातील "प्रकृतिरसा"ला आता मान्यताच लाभलेली आहे. मराठीमध्ये "उदात्तरसा"च्या अनुषंगाने निसर्गरसाचा विचार झालेला आहे. श्री.म.र.आगाशे यांनी "सारस्वत समीक्षे"त सृष्टिसौंदर्यविषयक काव्याचा विचार करून,त्यातील रसाविषयी व्यापक विचार मांडलेले आहेत. हिंदीमध्ये "प्रकृतिरसा"चा म्हणजेच निसर्गरसाचा सखोल विचार होऊन त्याचे अवयवही विस्ताराने सांगितले आहेत. सौंदर्यभावना हा निसर्गरसाचा स्थायिभाव सांगितला गेला आहे. वर सांगितलेल्या निसर्गप्रीतीच्या महत्त्वाच्या कारणांतील सौंदर्यवादाशी निसर्गरस विषयक हा विचार तंतोतंत जुळणारा आहे.

## निसर्गदर्शनातील विविधता -

निसर्ग नाना रूपाने माणसाला मोहित करीत असतो. शरदऋतूतील चांदरात, वसंताचे पुष्पवैभव, श्रावणधारांची बरसात ह्या सर्वांचा मनुष्य सुखद

---

[१] म.र.आगाशे, सारस्वत समीक्षा, प्रका. शि.गो.भावे, सातारा १९३४, पृ. १३५ ते १४०

अनुभव घेत असतो. सामान्य मनुष्य,तत्त्वज्ञ, वैज्ञानिक, कवी सर्वांनाच निसर्ग आकर्षित करीत असतो. परंतु यांपैकी प्रत्येकाचा निसर्गाकडे पाहण्याचा दृष्टिकोन भिन्न भिन्न असतो. सामान्य मनुष्य निसर्गाचे जे अवलोकन करतो ते स्थूल स्वरूपाचे असते. निसर्गातील सूक्ष्मतरल सौंदर्य त्याच्या पकडीतून सुटत असते. सर्वसामान्य माणसाच्या पकडीतून सुटणारे हे सौंदर्य कवी नेमके टिपत असतो. सामान्य माणसापेक्षा कवीच्या ठिकाणी अधिक संवेदनशीलता आणि कल्पनाशीलता असते, त्यामुळे सामान्य माणसाने एरव्ही पाहिलेला निसर्ग,काव्यामध्ये सौंदर्याने बहरून आलेला आढळतो. सामान्य माणसातही संवेदनशीलता, रसिकता, कल्पकता या गोष्टी असतात आणि म्हणूनच तो काव्याचा आस्वाद घेऊ शकतो, पण सामान्यमाणसापेक्षा कवीमध्ये प्रतिभेचा, संवेदनेचा आणि कल्पनेचा भाग अधिक असतो. कवीमध्ये असलेली तरल संवेदना, उज्ज्वल कल्पना आणि सूक्ष्म निरीक्षण सामान्य माणसामध्ये आढळत नाही. कविगत या वैशिष्टयांमुळे मूळचे निसर्गदृश्य अधिक वेधक बनते. प्रत्यक्ष निसर्ग नजरेसमोर पसरलेला असतानाही काव्यातील निसर्गचित्रणाचा आपण आनंद लुटतो याचेही हेच कारण होय. प्रत्यक्ष निसर्गदर्शनात आनंद आहेच, पण काव्यातील निसर्गचित्रणामुळे होणारा आनंद हा अधिकपटीने वाढलेला असतो. अशाप्रकारे सामान्य माणूस आणि कवी यांच्या निसर्ग--दर्शनात फरक आहे. हा फरक प्रकाराचा नसून प्रमाणाचा आहे,हे मात्र लक्षात घेतले पाहिजे. परमेश्वराने प्रत्येकाला प्रतिभेची, कल्पनेची आणि विचारशक्तीची देणगी दिलेली आहे. कवीमध्ये या गोष्टी अधिक तीव्र , तरल आणि सूक्ष्म स्वरूपात आढळून येतात एवढाच फरक आहे. कवी आणि सामान्य यांच्यातील हा फरक प्रकाराचा नसून प्रमाणाचा आहे एवढेच लक्षात घेतले पाहिजे.

वस्तुमात्राचे अंतिम स्वरूप समजावून घेणे हा तत्त्वज्ञानाचा मुख्य उद्देश असतो. बुध्दी आणि तर्क यांच्या आधाराने तत्त्वज्ञ अंतिम तत्त्वांचे

संशोधन करीत असतो. याउलट कवी भावना आणि कल्पना यांच्या साहाय्याने सौंदर्यचित्रण करीत असतो. तत्त्वज्ञाची निसर्गाची कल्पना तर्काशी निगडित असते,तर कवीची रसात्मकतेशी संबंधित असते. तत्त्वज्ञाची दृष्टी बौध्दिक, तर कवीची रसात्मक. पहिली बौध्दिक प्रक्रिया,तर दुसरी सृजनात्मक. यामुळेच काव्यात भावाविष्कार आणि अभिरुचिप्रकटन महत्त्वाचे ठरते, तर तात्त्विक ग्रंथांमध्ये बुध्दी आणि तर्क यांना विशेष महत्त्व प्राप्त होते. तसे पाहता कवी आणि तत्त्वज्ञ यांच्यात बरेच साम्य असते. दोघेही सत्यशोधनच करीत असतात. तत्त्वज्ञही श्रध्दा आणि कल्पना यांना पूर्णत: टाळू शकत नाही, कवीही बुध्दीशी पूर्णपणे फारकत करू शकत नाही. फरक येतो तो या गोष्टींतील प्रमाणभेदामध्ये. तत्त्वज्ञ तर्कालाच सर्वश्रेष्ठ स्थान देईल,तर कवी भावसत्यच सर्वश्रेष्ठ मानेल आणि हाच दोहोंतील खरा फरक आहे.

कवी आणि शास्त्रज्ञ यांच्या दृष्टिकोनातही असाच फरक आहे. या दोघांचाही निसर्गाशी संबंध येतो, पण शास्त्रज्ञ निसर्गाच्या बाहयरूपाचे अवलोकन करून विश्लेषण, वर्गीकरण, पृथ:करण इत्यादी प्रक्रियांद्वारा वास्तविक रूपाचा शोध घेत असतो. तटस्थपणे केलेल्या निरीक्षणाद्वारा सिध्दांत प्रस्थापन करणे ही शास्त्रज्ञाची पध्दती असते. याउलट कवीच्या निसर्गावलोकनात भावनेला अधिक महत्त्व असते. कवीच्या दृष्टीने सुंदर फूल म्हणजे केवळ देठ, पाकळ्या, केसर, पराग, मध यांचा समुदाय नव्हे किंवा चंद्र हा केवळ पृथ्वीसभोवती फिरणारा ग्रहगोल नव्हे. हे फूल किंवा चंद्र त्याच्या भावनांचे केंद्र असते. या गोष्टी त्याच्यादृष्टीने सचेतन असतात. त्याला फूल कधी हसताना तरी कधी रडताना आढळेल, [redacted] चंद्र हा कधी रजनीवल्लभ बनून, तर कधी त्याच्या प्रेयसीचा मुखचंद्र बनून त्याच्यासमोर उभा ठाकेल. जीवनात असलेले ज्ञानाचे महत्त्व कुणीही नाकारू शकत नाही, परंतु जीवनातील भावनेचे स्थानही अव्हेरता येत नाही. जीवनातून ही भावना गळून पडली,तर आपले जीवन रूक्ष झाल्याखेरीज राहाणार नाही.

मानवी जीवनातील भावनेचे हे स्थान स्पष्ट करीत डॉ. हरिद्वारीलाल शर्मा सांगतात, " मानवाचा अनुभव केवळ ज्ञानापर्यंतच सीमित नाही, त्याच्या भावना, कल्पनाशक्ती, आल्हाद आणि आनंद केवळ भ्रम किंवा मनोविकार नव्हे, तर ते संपूर्ण मानवी जीवनाचे अभिन्न, निकटतम, श्रेष्ठतम आणि प्रियतम विशेष आहेत. एक क्षण यांच्या अभावाची कल्पना करा, आपला सारा अनुभव आणि जीवन व्यर्थ गोष्टींचा केवळ एक प्रवाह बनून जाईल. [१] "
[ मराठी अनुवाद ]

कवी आणि शास्त्रज्ञ यांतील महत्त्वाचा फरक म्हणजे शास्त्रज्ञाचा दृष्टिकोण हा वस्तुनिष्ठ असतो आणि कवीचा भावनिष्ठ असतो. शास्त्रज्ञ चैतन्यपूर्ण मानवाला जड निसर्गाच्या पंक्तीला आणून बसवतो, तर कवी जड निसर्गाला मानवाच्या पातळीवर आणतो. कवीच्या दृष्टीने निसर्गाला स्वतंत्र सत्ता असते, स्वतंत्र व्यक्तित्व असते. त्याच्याबरोबर त्याचा हृदय-संवाद सुरू होतो. निसर्ग त्याचा सखा, सहचर बनून सजीव-सचेतन रूपात त्याच्यासमोर वावरतो.

सामान्य मनुष्य, शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ आणि कवी यांचा निसर्गाकडे पाहण्याचा दृष्टिकोण वेगवेगळा असतो, पण कवींचाही निसर्गाकडे पाहण्याचा दृष्टिकोण समान असतो असे नाही. "संध्यावर्णना"वर अनेक कवींनी कविता केलेल्या आहेत, परंतु त्यात साम्याचा भाग असला, तरी त्यांच्या वर्णनात बरीच वेगळीक आढळते. निसर्गदृश्य एकच असता त्याच्या कविकृत वर्णनात वेगळीक निर्माण होण्याची काही कारणे आहेत. त्यांतील प्रधान कारण म्हणजे कवीचे व्यक्तिमत्त्व हे होय. कवीचे जीवन, त्याचा मानसिक कल, सांस्कृतिक परंपरा,

---

[१] डॉ. हरिद्वारीलाल शर्मा, सौंदर्यशास्त्र, प्र. सं. इलाहबाद १९५३, पृ. ४

त्याची जीवनदृष्टी, वैयक्तिक लकबी, सामाजिक पार्श्वभूमी, समाजातील दर्जा यांतून कवीच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होत असते. या सर्वांतून आणि त्याची अंगभूत प्रतिभा आणि व्यासंग-निरीक्षणाने संस्कारित झालेली प्रज्ञा यांतून कवीचे व्यक्तिमत्त्व घडत असते. कवीच्या व्यक्तिमत्त्वात त्याची मूळ प्रवृत्ती, त्याची सर्वसामान्य परिस्थिती व विशेष तात्कालिक घटना, पूर्ववर्ती वाङ्‌मयाचे किंवा समकालीन वाङ्‌मयाचे त्याच्या संस्कारक्षम मनावर झालेले संस्कार या गोष्टी पहाव्या लागतात. काव्यनिर्मितीमध्ये, आपल्या दृष्टीने कवीचे हे व्यक्तिमत्त्व अतिशय महत्त्वाचे बनते.

कवी ज्या निसर्गाचे वर्णन करतो तो निसर्ग नेमका कसा असतो हेही लक्षात घेतले पाहिजे. "निसर्ग", "सृष्टी", आणि हिंदीमधील "प्रकृति" हे पर्यायी शब्द होत. "निसर्ग" या शब्दाने मानवेतर सर्व सचेतन अचेतन जगत असा अर्थ व्यक्त होत असला, तरी काव्यातील निसर्गाचा इतक्या व्यापक अर्थाने विचार होत नाही. श्री. ग. श्री. हुपरीकर "प्रकृति" हा शब्द "निसर्ग" या अर्थाने योजतात आणि प्रकृतिवर्णनाचा असा खुलासा करतात - " निसर्गातील आकाश, ग्रहतारे, मेघ, वायू, पर्वत, सागर, नद्या, सरोवरे.... इत्यादी विविध दृश्यांपैकी काही अथवा सर्व दृक्प्रदेशाचा एका दृष्टिक्षेपात कवीच्या मनावर होणारा संस्कार व त्या संस्काराचे कवीने केलेले ऐक्य--पर्यवसायी वर्णन म्हणजे प्रकृतिवर्णन होय." [१] आपल्या स्वाभाविक सौंदर्याने मानवाला आकर्षित करणाऱ्या मानवेतर जगतातील सर्व वस्तू "निसर्ग"मध्ये समाविष्ट होतात. या वस्तूंत मानवी कारागिरीचा कोणताही भाग मुळीच येत नाही, आणि म्हणून तर त्याला "निसर्ग" म्हणतात. हा "निसर्ग"

---

[१] ग. श्री. हुपरीकर, तत्त्वज्ञ कवि-ज्ञानेश्वर, ज्ञानेश्वरदर्शन भाग १, वाङ्‌मयोपासक मंडळ, अहमदाबाद सन् १९५६ पृ. २८५

आपल्या सहजसौंदर्याने प्राय: सर्व कवींना आकर्षित करीत असतो. हा "निसर्ग" म्हणजे काव्यातील "वस्तुपक्ष" किंवा "विभावपक्ष" होय.

काव्यांतर्गत निसर्गचित्रणात वस्तुपक्ष किंवा विभावपक्ष असा समसमान असला, तरी व्यक्तिसंबंधाने या चित्रणात फरक पडत राहातो. कवीचे व्यक्तिमत्त्व, त्याची अनुभव घेण्याची प्रवृत्ती यामुळे दोन कवींनी केलेल्या एकाच निसर्गदृश्याच्या वर्णनात फरक पडतो. चित्रकाराप्रमाणे केवळ निसर्गाचे अनुकरण करणे हा कवीचा उद्देश नसतो. तो एक नवनिर्मिती करीत असतो, आणि त्यामुळेच निसर्गातील पंचमहाभूतांचा विलास तोच तो असला, तरी प्रत्येक कवीचे निसर्गवर्णन वेगवेगळे बनते. निसर्ग चित्रणात "विभाव" जितका महत्त्वाचा, तितकाच कविगत "भाव"-ही महत्त्वाचा. निसर्गचित्रण म्हणजे "वस्तुपरक भावनिष्ठा" असते असे म्हणता येईल. कवी निसर्गाचे सूक्ष्म निरीक्षण करतो, पण या निरीक्षणाला तो आपल्या कल्पनांची आणि भाव--भावनांची जोड देत असतो. कविपरत्वे या कल्पना आणि भावना बदलत राहातात आणि कविकृत निसर्गचित्रणात वेगळीक येण्याचे हेच कारण आहे. अशा वेगवेगळ्या कल्पनांचे आणि भावनांचे अधिष्ठान कवीचे व्यक्तिमत्त्व हेच असते, त्यामुळे निसर्गचित्रणात फरक होण्याचे कवीचे व्यक्तिमत्त्व हेच प्रधान कारण आहे असेच दिसून येते. " *Principles of Literary Criticism* " या ग्रंथात ॲबरक्रोंबीने हाच विचार मांडताना म्हटले आहे, " *I do not give you my experience of looking at a landscape if my words merely represent what I have seen, nor if they merely represent my feelings, if this experience is to be matter of literature it must be experience whole and entire, both what I saw and what I felt in perfect combination.*" (१)

---

(१) Abercrombie, Principles of Literary Criticism. P. 34.

थोडक्यात, निसर्गचित्रणात निसर्ग महत्त्वाचा असला, तरी कवीचे व्यक्तिमत्त्वही तितकेच प्रभावी असते. निसर्ग-चित्रण म्हणजे " विभाव-भाव-संबंध " किंवा " वस्तु-व्यक्ति-संबंध " असतो असे म्हणता येईल.

सौंदर्याचे स्वाभाविक आकर्षण -

प्राय: असे आढळून येते की कविनिर्मित निसर्गकाव्यात सुंदर दृश्येच अधिक येतात. कवीच्या सौंदर्याकडील हा ओढा स्वाभाविकच मानावा लागेल. निसर्गप्रीतीच्या कारणात "सौंदर्यवाद"च महत्त्वाचा ठरतो. निसर्ग--रसाचा सौंदर्यभावना हाच स्थायिभाव मानला गेलेला आहे हेही लक्षात घेतले पाहिजे, पण ही गोष्ट लक्षात न घेता आ. रामचंद्र शुक्ल यांनी केवळ सौंदर्याची आसक्ती बाळगणाऱ्या निसर्गकवींना "भोगलिप्सू", "विषयी", "तमाशबीन" [तमासगीर] असे म्हटलेले आहे.[१] मराठीतील काही टीकाकारांमध्ये असाच गैरसमज आहे. निसर्गचित्रणात सुंदर-असुंदर, प्रसन्न-रौद्र अशा दोन्ही प्रकारचे निसर्गवर्णन आढळत असले, तरी निसर्गातील रमणीय रूपाची उपासनाच सर्वत्र आढळते. कवी हा स्वभावत: सौंदर्याचा उपासक असतो, त्यामुळे त्याच्या निसर्गकवितेत सुंदर दृश्यांचे चित्रण आधिक्याने यावे हे साहजिकच होय. शिवाय कवीचा हस्तस्पर्श झाला की, वस्तू सौंदर्याने निथळून निघते हेही लक्षात घेतले पाहिजे, मग असुंदर वस्तूदेखील सौंदर्याने भरून जाते. " आम्ही कोण ?" या कवितेत केशवसुतांनी म्हटले आहे[२] -

" पाणिस्पर्शच आमुचा शकतसे वस्तूप्रती द्यावया-
सौंदर्यातिशया, अशी वसतसे जादू करां-माजि या "

---

[१] आ. रामचंद्र शुक्ल, रसमीमांसा, द्वि-संस्करण , काशी १९६२ पृ. १२.
[२] शं. ना. जोशी, केशवसुतांची कविता, चित्रशाळा, पुणे, १९२७ पृ. १५२.

हे सारे विवेचन लक्षात घेतले तर केवळ सौंदर्यचित्रण करणाऱ्या कवींना वेडावाकडा बोल लावता येणार नाही.

निसर्गचित्रणाविषयीचे गैरसमज -

निसर्गचित्रणाच्या बाबतीत केवळ सौंदर्याचे चित्रण म्हणजे तमासगिरी होय हा जो गैरसमज आहे, तसेच आणखीही काही गैरसमज आहेत. एखादा कवी आपल्या कवितेत वृक्षवल्लरींची यादीच्या यादी देतो. या नामावलीलाच काही निसर्गचित्रण समजतात. एखादा कवी भौगोलिक वर्णन करतो आणि त्यालाच निसर्गचित्रण मानण्यात येते. कधीकधी अप्रस्तुताच्या ढिगालाच निसर्गचित्रण मानले जाते. निसर्गचित्रणाविषयी असे अनेक गैरसमज आहेत. निसर्गचित्रणात कवी निसर्गाचे सूक्ष्म निरीक्षण करीत असतो. ही सूक्ष्म अवलोकनशक्ती हा निसर्गचित्रणाचा पाया असतो. कवीच्या अवलोकनशीलतेला ही शक्ती म्हणजे एक आव्हान असते. कवीचे निरीक्षण सूक्ष्म असते आणि संवेदनाही तरल आणि समृध्द असतात. निसर्गाबद्दल पुरेपूर जिव्हाळा असलेला कवी त्याच्या दर्शनात तल्लीन होऊन जातो. यावेळी त्याच्या साऱ्या संवेदना क्रियारत होत असतात, आणि मग या साक्षात्काराचे एक संकलित चित्र त्याच्या हृदयावर उमटते, आणि त्याचेच प्रतिबिंब त्याच्या काव्यामध्ये शब्दबध्द होते. ते शब्दबध्द होताना त्या चित्राशी सुसंगत भावना आणि कल्पना यांचा संयोग होऊन ते अतिशय वेधक बनते. असे निसर्गवर्णन वाचल्याने, त्याच्या दर्शनाने कवीला आलेल्या अनुभूतीचा वाचकासही प्रत्यय येतो. ज्या निसर्गचित्रणाच्या वाचनाने कवीने पाहिलेल्या निसर्गदृश्याचा ठसा वाचकाच्याही अंत:करणावर उमटतो ते खरे निसर्गगीत होय. खऱ्या निसर्गगीताच्या वाचनाने आपणांस केवळ अर्थच समजत नसतो, तर आपल्या हृत्पटलावर तत्सदृश एक प्रतिबिंब उमटत असते. खरे निसर्गगीत असे प्रत्ययकारी असते. तेव्हा निसर्गचित्रणाची महत्त्वाची कसोटी म्हणजे

बिंबग्रहण होय. निसर्गविषयक शब्दावली केवळ अर्थग्रहण साधत असेल, तर ते निसर्गचित्रण नव्हे. नामावली, भौगोलिक वर्णन, अगर प्रस्तुताचा ढीग यांनी केवळ अर्थग्रहण होत असते. ते केवळ निसर्गाचे शब्दांकन असते. म्हणूनच अशा वर्णनाला निसर्गकविता मानणे हे गैरसमजाचेच होय. याउलट ख-या निसर्गकवितेत प्रतिबिंब निर्मितीचे म्हणजेच प्रत्ययकारीत्वाचे सामर्थ्य असते. असे सामर्थ्य ज्या निसर्गकवितेत असते ती निसर्गकविता होय.

निसर्गकवितेत कवीची निसर्गविषयक अभिरूची महत्त्वाची असते. मुळात कवीच्या ठिकाणी निसर्गविषयीची आत्मीयता, जिव्हाळा पाहिजे. तो नसेल तर निसर्गातील वस्तूंचा केवळ उल्लेख असलेल्या त्याच्या कवितेला निसर्गकविता मुळीच म्हणता येणार नाही. कवीची ही निसर्गविषयक अभिरूची विविध रूपात व्यक्त होते. निसर्गाच्या संश्लिष्ट चित्रणात ती जशी दिसेल, तशीच ती त्याच्या उपमानांतूनही व्यक्त होईल. निसर्गचित्रण संश्लिष्ट असो, प्रतिमारूप असो, अथवा उपमानरूप असो, त्यात महत्त्व कशाला असेल तर कवीच्या निसर्गविषयक अभिरूचीला. सूक्ष्म निरीक्षण आणि तरल संवेदना असल्याखेरीज कवीला चपखल प्रतिमा किंवा उपमा सुचणार नाहीत.

## काव्यात आढळणारी विविध निसर्गरूपे

काव्यामध्ये निसर्ग विविध रूपाने येतो, पण निसर्गाच्या या विविध रूपांकडे मराठी समीक्षकांचे जावे तसे लक्ष आजवर गेलेले नाही. प्रा. रा. श्री. जोग यांनी सृष्टिवर्णनाचे यथातथ्य सृष्टिवर्णन, रूपकात्मक सृष्टिवर्णन, उपमाउत्प्रेक्षांचे साहाय्य घेऊन रेखाटलेले कल्पनाप्रधान सृष्टिवर्णन, मानवीकरणरूप सृष्टिवर्णन, तत्त्वज्ञानप्रतिपादनरूप सृष्टिवर्णन, असे सृष्टिवर्णनाचे विभाग ध्वनित केले आहेत.[१]

---

[१] रा. श्री. जोग, केशवसुत, के. भि. ढवळे, मुंबई, १९४७.

डॉ. के. ना. वाटवे यांनीही 'संस्कृत नाट्यसौंदर्य' या ग्रंथात निसर्गाच्या विविध उपयोगांचा निर्देश केलेला आहे. ते लिहितात, "कविलोक निसर्गाचा काव्यात वापर पाहणाऱ्याला त्याच्या सौंदर्याची ऐंद्रिय प्रतीती देण्यासाठी करतात. हा झाला निसर्गाचा प्राथमिक उपयोग, यानंतर निसर्गाचा पार्श्वभूमी म्हणून उपयोग केला जातो. यामध्ये कधी विरोधाने तर कधी साम्याने मानवी जीवनाला उठाव दिला जातो. निसर्गाचे स्वरूप शांत, तर मानवी जीवनात वादळ, किंवा याउलट. यानंतर कविलोकांना निसर्ग व मानव यांमध्ये साम्य आढळते. म्हणून निसर्गाच्या उपमा मानवाला व मानवाच्या निसर्गाला दिल्या जातात. यानंतर निसर्ग आणि मानव यांमध्ये सहानुभूती असते. म्हणजे मानवाचे बरेवाईट झाले तर, निसर्गालाही त्याचे सुखदुःख वाटते अशीही वर्णने केलेली आढळतात." [१]

निसर्गरूपांच्या वर्गीकरणाचा प्रश्न काहीसा कठीण आहे, तथापि विश्लेषणाने काही वर्ग आपल्याला निश्चित करता येतील. निसर्गचित्रणामध्ये प्रामुख्याने खालील रूपे आढळतात –

१] आलम्बनरूप निसर्गचित्रण.
२] उद्दीपनरूप निसर्गचित्रण.
३] मानवीकरणरूप निसर्गचित्रण.
४] पृष्ठभूमिरूप निसर्गचित्रण.
५] तत्त्वज्ञानप्रतिपादनरूप निसर्गचित्रण.
६] उपदेशरूप निसर्गचित्रण.
७] अलंकरणरूप निसर्गचित्रण.

---

[१] के. ना. वाटवे, संस्कृत नाट्यसौंदर्य, देशमुख आणि कंपनी, पुणे १९६२.पृ. २५९.

आलम्बनरूप निसर्गचित्रण -

साध्यरूप निसर्गचित्रणाला आलम्बनरूप निसर्गचित्रण असे म्हणतात. यांत निसर्गाच्या सहज, स्वाभाविक रूपाची अभिव्यक्ती असते. निसर्गाच्या स्वाभाविक सौंदर्यात तल्लीन झालेला कवी रंग, आकृती, ध्वनी, गंध यांचा साकल्याने आस्वाद घेतो आणि त्यातच मग्न होऊन जातो. अशा निसर्गाच्या दर्शनाने अनुभूतीशील बनलेला कवी आपल्या अनुभूतीला शब्दबध्द करतो. निसर्गदर्शनाने त्याला झालेला आनंद त्याच्या काव्यात व्यक्त होतो. साक्षात् निसर्गदर्शनाने झालेला आनंद ज्या कवितेत व्यक्त होतो त्या कवितेला आलम्बनरूप निसर्गकविता असे म्हटले जाते. अशा निसर्गचित्रणात निसर्ग हाच कवीच्या भावनेचा आलम्बन बनलेला असतो. आलम्बनरूप निसर्गचित्रणाचे उदाहरण म्हणून गिरीशांच्या "शांतिस्थान" या कवितेचा उल्लेख करता येईल. या कवितेत निसर्गाची शांत, सुंदर एकांत स्थळे मन लवकर निववितात असा कवीचा अनुभव प्रकट झाला आहे -

एकच शांतिस्थान मला तू। एकच शांतिस्थान।
राने भवताली हिरवळली
शेते गंधाने दरवळली
जळे ओहळातुन खळखळली
चिन्झणवारे वंशतरूतुन गाती मंजुळ गान।
खडक बाजुला विशाल सुंदर
खाली ओबडधोबड फत्तर
कपारीत ही झुडपे वरवर
शुभ्र, लाल या तटी कण्हेरी डुलती लववुनि मान।
गवतुन गेल्या काळ्या डगरी
एक झोपडी ही उंचावरि
पलीकडे त्या, माझी नगरी
फुले फुलोरा, मीच फुलारी हा माझा अभिमान।[१] [ शांतिस्थान ]

---

[१] गिरीश, "कांचनगंगा", रविकिरणमंडळ पुणे, प्रथमावृत्ती, १९३० पृ. २८-२९.

हिरवळलेली राने, गंधाने दरवळलेली शेते, ओहळातून खळखळणारी जळे, वंशतरूतून विंझणवा-याचे चालणारे मंजुळ गान, कपारीतील झुडपे, तटावर डोलणा-या शुभ्रलाल कण्हेरी अशा प्रकारचे एक भरीव चित्र या कवितेत दिसून येते. "राने हिरवळली", "शेते दरवळली", "शुभ्रलाल या तटी कण्हेरी", "वंशतरूतून वाहणारे वा-याचे मंजुळ गान" यांमध्ये रंग, गंध, नाद या संवेदना उत्कटतेने व्यक्त झाल्या आहेत. हे आलंबनरूप निसर्गचित्रणाचे उदाहरण आहे.

उद्दीपनरूप निसर्गचित्रण -

उद्दीपनरूप निसर्गचित्रणात निसर्ग साधनरूपाने येतो. स्थायिभावाचे दुसरेच एखादे आलम्बन असते आणि निसर्गवर्णन त्याला उद्दीप्त करते. संस्कृत काव्यशास्त्रज्ञांनी निसर्गाला शृंगाररसाच्या उद्दीपन विभागात गणलेले आहे. संयोगकाळी प्रेमीजन फुलांमध्ये, पक्ष्यांच्या जोडप्यामध्ये, वृक्षलतांत सगळीकडे पारस्परिक आकर्षणाचा अनुभव घेतात. कोकिलकूजिताने त्यांचा प्रेमभाव द्विगुणित होतो, तर वसंतऋतूतील पुष्पवैभवाने त्यांच्या प्रेममीलनाला एक मादकता प्राप्त होते. शीतल, सुरभित-समीर, कोकिलकूजित, निर्झरसंगीत, वृक्षराजी, सरितातट, चंद्रज्योत्स्ना यांमुळे मीलन प्रसंगी प्रेमभाव उद्दीप्त होतो. संयोगाच्या वेळी गोडवा निर्माण करणारा हा निसर्ग वियोगाच्या वेळी मात्र क्लेशदायक ठरतो. संयोगकाळी झुळझुळ वाहणारा निर्झर, पीठूर चांदणे उधळणारा चंद्र, कोकिलकूजित, पुष्पसुगंधाने दाटून राहिलेले वन, शीतल मलयसमीर या गोष्टी कोण आनंददायी वाटतात, पण विरहकाळी याच वस्तू खायला उठतात. मनुष्य कोणत्याही मनःस्थितीत असला तरी निसर्गाशी असलेले त्याचे नाते तुटत नाही. उद्दीपनरूप निसर्गचित्रणात निसर्ग प्राय: शृंगाराचे उद्दीपन म्हणून येत असतो. यात शृंगाराचा रती हा स्थायिभाव साध्यरूप असतो. शृंगाररसात उद्दीपनरूप निसर्गवर्णनाची अनेक उदाहरणे आढळतात.

प्रियसखीच्या सहवासात कवी हरिवंशराय बच्चन रात्रीची मादकता अशी वर्णन करतात -

शिथिल पडी है नभ की बाहों
में रजनी की काया
चाँद चाँदनी की मदिरा में
है डूबा, भरमाया,
अलि अब तक भूले-भूले-से
रस भीनी गलियोंमें
प्रिय, मौन खडे जल जात अभी मत जाओ,
प्रिय, शेष बहुत है रात, अभी मत जाओ
[१]
मिलनयामिनी १०३

याउलट संयोगकालात सुखकर वाटणाऱ्या गोष्टी वियोगकालात दु:खकारक बनतात. वियोगकाली मब चंद्र दाहक बनतो, फुले अंगार बनतात, आणि कोकिळेचा स्वर व्यथा वाढवितो. ज्ञानेश्वरांच्या एका अभंगात या अनुभूतीचे सुरेख चित्र असे आले आहे -

चाँदवो चाँदणे। चापेवो चंदनु। देवकीनंदनु। विण नावडे वो।।
चंदनाची चोळी। माझे सर्व अंग पोळी। कान्हो वनमाळी। वेगी भेटवा कां।
सुमनाची सेज। सितल वो निकी। बोले आगिसारिखी। वेगी विझवा कां।।
तुम्ही गातसां सुस्वरें। ऐकोनि द्या उत्तरे। कोकिळे वर्जावे। तुम्ही बाईयांनो
[२]
- ज्ञानेश्वरांचे अभंग.

---

[१] चंद्रगुप्त विद्यालंकार,हरिवंशराय बच्चन, राजपाल एण्डसन्स, दिल्ली, १९७१, पृ. १०१.

[२] वा. रा. ढवळे, व. दि. कुलकर्णी-मराठी कविता. प्राचीन कालखंड, मुंबई मराठी साहित्य संघ, १९६९, पृ. १९.

मानवीकरणरूप निसर्गचित्रण -

कवींना निसर्ग सजीव सचेतन वाटत असतो आणि म्हणूनच मानवी भावभावनांचे दर्शन त्यांना निसर्गात होत राहाते. मानवी जीवन-व्यापार त्यांना निसर्गात दिसू लागतो. मग त्यांच्या दृष्टीने नदी आणि समुद्र यांचे पति-पत्नी रूपाने मिलन होते, लतारूप प्रेयसी वृक्षाला कवटाळते, चंद्र रजनीनाथ बनतो. निसर्गाशी मित्रत्वाचे नाते अनेक कवींनी जोडलेले आहे. निसर्ग माणसाप्रमाणे हालचाल करतो, माणसाच्या सुखदु:खात तो सामील होतो अशी कवींची भावना असते. निसर्गावर अशाप्रकारे मानवी भावभावनांचा आरोप करून त्याचे जे चित्रण केले जाते त्याला मानवीकरणरूप निसर्गचित्रण म्हणतात. मर्ढेकरांच्या " आला आषाढ श्रावण " या कवितेत निसर्गाचे असे मानवीकरण झाले आहे—

ओल्या कौलारं कौलारी
मेघ हुंगतात लाली,
ओल्या पानातल्या रेषा
वाचतात ओले पक्षी
आणि पोपटी रंगाची
रान दाखविते नक्षी [१]

पृष्ठभूमिरूप निसर्गचित्रण -

काव्यामध्ये वातावरण निर्मितीच्या हेतूने जे निसर्गचित्रण केले जाते त्याला पृष्ठभूमिरूप निसर्ग-चित्रण असे म्हणतात. कवि-कथित कथाप्रवाहात वाचकाचा मनोमन प्रवेश होण्यास अशा निसर्ग-चित्रणाचा उपयोग होतो.

---

[१] बा. सी. मर्ढेकर, मर्ढेकरांची कविता, मौज प्रकाशन, मुंबई, १९५९, पृ. १५८.

कवी निसर्गाच्या सान्निध्यात आपल्या कथेतील पात्रांना पाहाणे पसंत करतो. गिरीशांच्या "बकुळा" या कवितेत बकुळा आणि चंद्रोजी यांच्या शोकात्म प्रीतीची कथा आहे. या शोकात्म कथेची पृष्ठभूमी म्हणून निसर्गाचे खालील चित्र आले आहे -

हिरवी झाडी मुळा मुठेच्या दोहितटांवर ही दाट
इकडे पेरुबाग आणखी तिकडे मळ्यांचा थाट
संगमलेला ओघ नद्यांचा गभीर हा मधुनी वाहे
रानफुलांचा पाणवेलिंचा वास तटी दरवळताहे
आषाढाच्या सरी लागल्या, रिपरिपली वरुनी धार
रात्र पसरली घोर, भोवती भयाण पडला अंधार। [१]

तत्त्वज्ञानप्रतिपादनरूप निसर्गचित्रण -

निसर्गातील राशिराशी सौंदर्याचे अवलोकन करताना मानवाला या सौंदर्याचा निर्माता कोण अशी जिज्ञासा झाली असेल,तर ते स्वाभाविकच होय. निसर्गाच्या सौंदर्याचे दर्शन घेता घेता माणसाला एका अव्यक्त सत्तेची कल्पना सुचली आणि यातूनच निसर्गाकडे पाहण्याची तात्त्विकदृष्टी निर्माण झाली. अनेक कवितांत ही तत्त्वज्ञानप्रतिपादनरूपदृष्टी व्यक्त झालेली आहे. आकाशस्थ ग्रहनक्षत्रांकडे पाहता पाहता जयशंकर प्रसाद यांच्यात कुतूहल जागते ते असे -

महानील इस परम व्योम में अंतरिक्षमें ज्योतिर्मान!
ग्रह, नक्षत्र और विद्युत् कण किसका करते से संधान! [२]
[कामायनी, पृ. २६-२८]

---

[१] गिरीश,कांचनगंगा,प्र.शं.के.कानेटकर,रविकिरण मंडळ,१९३०,पृ.१४०
[२] जयशंकर प्रसाद, कामायनी, प्र.भारती भंडार,लीडर प्रेस, इलाहबाद, वि.सं.२००९, पृ.२६-२८.

केशवसुतांना सृष्टीतील सर्व रहस्ये पुष्पामध्ये आणि खगकूजितामध्ये प्रकट होतात असे वाटते -

पुष्पामधे प्रकट होय न जे जराही
सृष्टीत एकहि रहस्य असे न काही
ज्याचा ध्वनी न उमटे खगकूजितात
नाही निगूढ इतिहास असा जगात। [१]

[ सृष्टि, तत्त्व आणि दिव्यदृष्टी ]

उपदेशात्म निसर्गचित्रण -

निसर्ग ही माणसाची फार मोठी प्रेरणा आहे आणि म्हणून पुष्कळदा कवी निसर्गाला आपला गुरू समजतात. निसर्ग आपल्याला पुष्कळ गोष्टी शिकवून जातो यात काही खोटे नाही. कवींनी पृथ्वीची क्षमाशीलता, मेघांची दानशूरता आणि सूर्याची समदृष्टी यांसारख्या सृष्टीतील उदात्त गुणांचा अनेक ठिकाणी उल्लेख केलेला आहे. वर्डस्वर्थला हजारो शिक्षकांपेक्षा निसर्ग अधिक काही शिकवून जातो असे वाटते. तो म्हणतो-

*" One impulse from a vernal wood,*
*May teach you more of men,*
*Of moral evil and of good,*
*Than all the sages can." (1)*

आणखी तो सांगतो

*" To me the meanest flower that blows can give*
*Thoughts that do often lie too deep of tears."(2)*

---

[१] सी. के. दामले, केशवसुतांची कविता, चित्रशाळा, पुणे, १९२७ पृ.

[२] *W.Wordsworth,'The Tables Turned,"The English Poets,pg.* 18

[३] *W.Wordsworth,The Golden Treasury" , page 314*

निसर्ग हा अनेक बाबतीत खरोखरच आपला गुरु आहे, कारण निसर्गाला एक नियमितता आहे, "ऋत" तत्त्व आहे, त्याग आहे. त्यामुळेच उपदेशाचा शोध घेताना निसर्गाकडे आपली दृष्टी जाते.

अलंकरणरूप निसर्गचित्रण -

निसर्गातील रंग-रूप, आकार-प्रकार, ध्वनी-निनाद, गंध-स्पर्श या विविधांगी सौंदर्याचा उपयोग मानवाने मानवी सौंदर्याच्या अभिव्यक्तीसाठी करून घेतला आहे. मानवी रूप, गुण आणि भाव यांचे साम्य कवींना निसर्गामध्ये आढळते आणि मग ते उपमान रूपाने निसर्गवस्तूंची योजना करतात. या अलंकारयोजनेत कवीची निसर्गविषयक अभिरूची स्पष्ट होते. कवी पारंपरिक उपमाने योजत असतोच, पण त्याबरोबरच नूतन उपमानांची योजनाही करीत असतो. अशारीतीने अलंकारांच्या रूपाने निसर्गाची जी अभिव्यक्ती होते तिला अलंकरणरूप निसर्गचित्रण असे म्हणतात. कवींना हे अलंकार कुठून सुचतात हे सांगताना प्रा. रा. श्री. जोग लिहितात, "कविप्रतिभेने नवीन साम्यदर्शन व्हावयाचे असल्यास कवीला निसर्गाकडेच जावे लागते. मानवी जीवनातील घटना, परिस्थिती आणि व्यक्तिविशेष ह्यांना निसर्ग-मध्ये सादृश्य शोधणे हा उपमादी अलंकारांचा प्रमुख भाग आहे. त्यातही ठराविकपणा आल्यास कविप्रतिभेचा निकष लागत नाही. परंतु निसर्गाचा प्रांत कवीला विपुलपणे उपलब्ध आहे. केवळ एक सूर्य वा चंद्र घेतला तर त्याचा उपयोग विवेचनाकरिता, चारुत्व न सोडता, ज्ञानेश्वरांनी इतक्या विविध प्रकारांनी करून घेतला, म्हणून त्यांच्या त्या प्रकारच्या प्रतिभे बद्दल शंका निर्माण होत नाही, उलट अचंबा वाटत राहतो."[१]

---

[१] प्रा. रा. श्री. जोग, मराठी वाङ्मयाचे विहंगमावलोकन, पुणे विद्यापीठ, १९५९, पृ. १५१

काव्यामध्ये निसर्गचित्रण असे विविधरूपांनी येत असले तरी सर्व निसर्गकवींत ही सर्व रूपे आढळतात असे नाही. त्या त्या कवीच्या व्यक्तिमत्त्वानुरूप, अनुभव घेण्याच्या पध्दतीनुरूप यांतील काही रूपाकडे त्याचा अतिशय ओढा आढळतो, तर काही रूपे अपवादानेच त्याच्या काव्यात व्यक्त होतात. निसर्गरूपांच्या आविष्काराचा विचार करताना ही गोष्ट नजरेआड होणा उपयोगाची नाही.

निष्कर्ष -

[१] निसर्ग हा मानवी जिव्हाळ्याचा महत्वाचा विषय असल्यामुळे ललित साहित्याचा तो प्रेरक भाग ठरतो, आणि त्यामुळेच सर्वकाळातील बहुतांश साहित्यात निसर्गचित्रण झालेले आढळते.

[२] निरागस बालक असो, मनुष्य सुखी असो अगर निराश असो किंवा अनासक्त साधू असो, सर्वांच्या ठिकाणी निसर्गाचे आकर्षण आढळून येते.

[३] या निसर्गप्रीतीची तत्त्वज्ञ, वैज्ञानिक आणि विकासवादी इत्यादींनी अनेक कारणे सांगितलेली असली तरी, निसर्गाची सुंदरता हेच निसर्गप्रीतीचे खरे कारण आहे.

[४] पारंपरिक रसमालिकेत "निसर्गरस " नामक आणखी एका रसाची भर घातली गेलेली आहे. या निसर्गरसाचा सौंदर्यभावना हा स्थायिभाव मानला गेलेला आहे.

[५] निसर्गप्रतिमेची मीमांसा करणारा सौंदर्यवाद आणि निसर्ग--रसाचा सौंदर्यभावना हा मानला गेलेला स्थायिभाव लक्षात घेतला, तर कवीने निसर्गातील केवळ सुंदर दृश्यांची चित्रणे केली म्हणून त्याच्यावर संकुचिततेचा अगर तमासगिरीचा आरोप करता येणार नाही. निसर्गचित्रणा-संबंधीची सम्यक कल्पना नसल्यामुळेच असे आरोप केले जातात.

[६] निसर्ग तोच असला तरी त्याच्याकडे पाहण्याचा सामान्य माणूस, तत्त्वज्ञ, शास्त्रज्ञ आणि कवी यांचा दृष्टिकोण भिन्न भिन्न असतो.

कवीच्या दृष्टीने निसर्ग सजीव, सचेतन असतो, तो भावुक आणि कल्पनापरिपूर्णदृष्टीने निसर्गाकडे पाहात असतो, त्यामुळे कविकृत निसर्गचित्रण वेधक बनत असते. निसर्गचित्रण हा वस्तु-व्यक्तिसंबंध असतो ही गोष्ट निसर्गचित्रणात महत्त्वाची ठरते.

[७] निसर्गचित्रणासंबंधी बरेच गैरसमज आहेत. निसर्गचित्रणात रौद्र, भीषण रूपाचे वर्णन यावयासच पाहिजे हा जसा एक गैरसमज, त्याचप्रमाणे नामावली म्हणजे निसर्गचित्रण, भौगोलिकवर्णन म्हणजे निसर्गचित्रण, अप्रस्तुताचा ढीग म्हणजे निसर्गचित्रण अशा ज्या समजुती आहेत त्याही गैरसमजावर आधारलेल्या आहेत.

[८] निसर्गवर्णनाने केवळ अर्थग्रहण घडता उपयोगी नाही. बिंबग्रहण ही निसर्गचित्रणाची कसोटी आहे. कवीने जे निसर्गदृश्य पाहिले आणि तो आनंदनिर्भर झाला, त्या दृश्याचे प्रतिबिंब वाचकाच्या हृदयात उमटले पाहिजे. कवीने जे पाहिले, ऐकले, अनुभवले तेच वाचकालाही पाहाता, ऐकता व अनुभवता आले पाहिजे. निसर्गचित्रण असे प्रत्यय--कारी असले पाहिजे.

[९] निसर्गचित्रणात विविध प्रकार आढळतात. आलंबनरूप, उद्दीपनरूप, मानवीकरणरूप, पृष्ठभूमिरूप, तत्त्वज्ञानप्रतिपादनरूप, उपदेशरूप, अलंकरणरूप अशी निसर्गचित्रणाची विविधरूपे आढळून येतात. निसर्गचित्रणाचे कोणतेही रूप असो, त्यात कवीची निसर्गविषयक अभिरुची, जिव्हाळा व्यक्त होतो की नाही हा महत्त्वाचा भाग होय. निसर्ग--विषयी जिव्हाळा असलेल्या कवीत ही सर्वच रूपे आढळतील असे नाही. त्याचे व्यक्तिमत्व आणि अनुभव घेण्याची पध्दती यावर ते अवलंबून असते. त्यामुळे केवळ रूपसमृध्दीवर कवीची योग्यता पारखणे योग्य होणार नाही.

=0=0=0=0=